# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ .
फॅक्स : २२०२९३४८.
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahamjp.com

क्र.मजीप्रा/२०११/सभा-१२२/(८८)/आ.४ दिनांक :०३.१२.२०११

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय : दि. २३.११.२०११ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२२ व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय /महोदया,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बुधवार दिनांक २३.११.२०११ रोजी झालेल्या १२२ व्या सभेचे इतिवृत्त आपले माहितीसाठी यासोबत सादर करण्यांत येत आहे.

आपला विश्वासू,
3/12/11
(पंजाबराव वानखडे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : १२२ व्या सभेचे इतिवृत्त.
पृ.क्र. १ ते १२.

प्रत,

१. मुख्य अभियंता, म.जी.प्रा.जलव्यवस्थापन, ठाणे / प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे/ नागरी व ग्रामीण योजना, नवी मुंबई / अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१३ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

२. वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
वित्त व लेखा शाखेशीं संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र. ६, ७, ९ व १० वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

३. अधीक्षक अभियंता (मु.),/ कार्यकारी अभियंता (तां) म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स,मुंबई.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र. ५ व १४ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

४. उप मुख्य लेखा अधि. (१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

५. उप सचिव, पा.पु.व स्व.वि., मंत्रालय, मुंबई.

६. आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा., मुंबई.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र. ३,४,५, ८ व ११ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

७. कार्यकारी अभियंता, मजीप्रा, नागरी व ग्रामीण योजना विभाग, ठाणे.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या "आयत्या वेळीच्या चर्चा" वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

८. प्रशासकीय-नि-आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

९. कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
आपल्या कार्यासनाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.२ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

१०. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी यांच्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

११. सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व संबंधीतांनी कार्यपुर्ती अहवाल
दि. ११/१२/२०११ पर्यंत सादर करावा

Nng.११८ Sabha.p.४..

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई-२१
रवाना
५/१२/११

सही ________

(३)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२२ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२२ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.लक्ष्मण ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक २३/११/२०११ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा.ना.श्री.लक्ष्मण ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री.रणजीत कांबळे, राज्यमंत्री,पा.पु.व स्व.तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म.म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२.
५. मा.सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, यांच्या वतीने श्री.दि.ग.मोरे , उप सचिव ग्रामविकास विभाग, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
६. मा.प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म.म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२.
७. श्री.राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई ४०००३२.

या व्यतिरिक्त सदर सभेस मजीप्राचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री.पंजाबराव वानखेडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
२. श्री. हेमंत लांडगे मुख्य अभियंता,म.जी.प्रा.जलव्यवस्थापन ठाणे.
३. श्री.व्ही.आर.कल्याणकर,मुख्य अभियंता,नागरी व ग्रामीण योजना,नवी मुंबई.
४.श्री.बा.शि.पाटील, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,(प्रभारी ) म.जी.प्रा., नवी मुंबई.
५.श्री.बी.के.सवाई,अधीक्षक अभियंता(मुख्यालय) म.जी.प्रा.मुंबई.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव व मुख्य प्रशासकीय अधिकारी,यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे स्वागत करण्याचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, पा.पु. व स्व.वि.यांनी केल्याने सर्वानुमते सदर उभयतांचे स्वागत करण्यात आले . तद्नंतर मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष,म.जी.प्रा. यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

30/11

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२१ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दिनांक २८.६.२०११ रोजी संपन्न झालेल्या १२१ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२१ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २८/६/२०११ रोजी संपन्न झालेल्या १२१ व्या बैठकीमध्ये ज़े निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार मालमत्तेची संख्या ३२४ पैकी ९७ मालमत्ता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नावे आहेत. व उर्वरित २२७ मालमत्ता म.जी.प्रा.च्या ताब्यात असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नावे केलेल्या नाहीत. याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सर्व मालमत्तेची देखभाल व संरक्षणासाठी एक स्वतंत्र कक्षाची निर्मिती करण्यात येत असल्याबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. यावर मा. राज्यमंत्री, तथा उपाध्यक्ष यांनी उर्वरित मालमत्ता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नावे करण्याची कारवाई करावी असे सूचित केले.

कार्यक्रम बाब क्र.३ : स्थानिक स्वराज्य संस्थांकडे प्रतिनियुक्तीवर पाठवावयाच्या कार्यकारी अभियंता यांच्या सोबत म.जी.प्रा.तील अतिरिक्त कर्मचा-यांपैकी जास्तीत जास्त बिगर अभियंता कर्मचा-यांनाही प्रतिनियुक्तीवर पाठविण्याबाबत.

या कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास असे अवगत केले की,म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांच्या सेवेची नगरपालिका/महानगरपालिका महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे मागणी करतात. तथापि याबाबत सदस्य सचिव यांनी काही महानगरपालिका आयुक्तांशी चर्चा केली असता कमी कालावधीची सेवा शिल्लक असणारे कर्मचारी यांना कायमस्वरुपी महानगरपालिकेमध्ये सामावून घेणे म्हणजे त्यांच्या पेन्शनची जबाबदारी स्विकारणे व्यवहार्य होणार नाही असे मत व्यक्त केले.

या अनुषंगाने ज्या कर्मचा-यांची सेवा १० वर्ष किंवा त्यापेक्षा कमी वर्ष शिल्लक असेल त्यांना प्रतिनियुक्तीवर तर १० वर्षापेक्षा जास्त सेवा शिल्लक असेल त्यांना कायम स्वरुपी निवृत्ती

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

वेतन / उपदान इत्यादींच्या जबाबदारीसह संबंधीत नगरपालिका / महानगरपालिकेमध्ये समाविष्ठ करण्याचे अटीवर अभियंत्या सोबत बिगर अभियंते कर्मचारी यांना महानगरपालिका / नगरपालिकेकडे प्रतिनियुक्ती / कायमस्वरुपी पाठविण्यात यावे अशी चर्चा होऊन खालिल प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

## ठरावः-

असा ठराव करण्यात येतो की, ज्या नगरपालिका/ महानगरपालिका कडून म.जी.प्रा.कडील अभियंता यांना त्यांच्याकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्याची मागणी करतील, त्यावेळी सदर अभियंता बरोबर म.जी.प्रा.कडील अतिरिक्त कर्मचा-यापैकी जास्तीत जास्त बिगर अभियंता कर्मचारी प्रतिनियुक्तीवर घेणे स्थानिक स्वराज्य संस्थेस बंधनकारक / अनिवार्य राहील असे बिगर अभियंता कर्मचारी पाठवितांना ज्यांच्या सेवा १० किंवा त्यापेक्षा कमी कालावधीकरिता शिल्लक आहेत त्यांना प्रतिनियुक्तीवर तर १० वर्षापेक्षा जास्त सेवा शिल्लक असलेल्या कर्मचा-यांना त्यांच्या निवृत्तीवेतन / उपदान इत्यादींच्या जबाबदारीसह कायमस्वरुपी सामावून घेण्याकरिता वर्ग करण्यात यावे. किती बिगर अभियंता कर्मचारी प्रत्येक प्रतिनियुक्तीवर अभियंता बरोबर पाठवायचे याबाबत प्रकरणनिहाय निर्णय घेण्याचे अधिकार सदस्य सचिवांना देण्यात येत आहेत. तसेच प्रतिनियुक्तीवर जाणा-या (नगरपालिका /महानगरपालिका ) अभियंत्यांच्या सेवा सेवानिवृत्तीचे पेन्शन व इतर अनुषंगिक लाभासहित सदर नगरपालिकेने / महानगरपालिकेने स्वीकारणे बंधनकारक राहिल.

कार्यक्रम बाब क्र.४ : जिल्हा परिषद /नगरपालिका/महानगरपालिका इत्यादी ठिकाणी प्रतिनियुक्तीवर गेलेल्या व ज्यांच्या बद्दल तक्रारी आहेत, अशा अधिका-यांना परत बोलाविण्याबाबत आढावा घेणे.

या कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास असे अवगत केले महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील अभियंता संवर्गातील अधिका-यांना स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा परिषदेकडे त्यांच्या मागणी पत्रानुसार प्रतिनियुक्तीवर पाठविले जाते तथापि काही वेळा संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था व जिल्हा परिषदेकडून सदर अधिका-यांच्या तक्रारी वरुन म.जी.प्रा.कडे प्रत्यावर्तीत करुन घेण्याबाबत विनंती केली जाते. सबब, यापुढे महानगरपालिका , नगरपालिकेकडे जे अभियंते प्रतिनियुक्तीवर कार्यरत् आहेत, मात्र अशा अभियंत्यांबद्दल तक्रारी आहे अशा वर म.जी.प्रा.च्या सेवेत प्रत्यावर्तीत करुन घेतले जाईल. सदर बाब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळास अवगत करण्यात आली यावर पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

30/11

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाबत क्र.५ : म.जी.प्रा.च्या कामकाजाच्या दृष्टीने पुनर्रचना केल्यानुसार कार्यालयांची स्थापना करण्यासाठी आवश्यकता असल्यास जागा भाडयाने /मालकी हक्काने घेण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे बाबत.**

मा. सदस्य सचिवांनी वरील कार्यक्रम बाबीबाबत संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अंतर्गत बळकटीकरणासंदर्भात झालेला बदल लक्षात घेता मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र , सनियंत्रण व संशोधन विकास आणि प्रशिक्षण गुणवत्ता परिक्षण तसेच I.T. सेल हे प्रत्यक्ष सदस्य सचिव यांचे नियंत्रणाखाली आणले आहेत. तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्या नियंत्रणाखालील कर्मचारी सध्या सिडको भवन,बेलापूर येथे कार्यरत आहेत. त्यापैकी काही अधिकारी कर्मचारी व सी.पी.डी.एम.चे अधिकारी / कर्मचारी सदस्य सचिव यांचे कार्यालयात आणणे गरजेचे आहे यासाठी या सर्व अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवा मुंबई येथे एकाच ठिकाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून व सध्याच्या एक्सप्रेस टॉवर्स येथील जागे अभावी शक्य होत नसल्याने मंत्रालयीन परिसरामध्ये अंदाजित ३००० ते ३३०० चौ, फुट जागा भाडे तत्वावर घेणे गरजेचे आहे. याकरिता वर्तमान पत्रात जाहिरात देऊन जागेची निविदा मागविल्याचे सदस्य सचिव यांनी अवगत केले आहे. याबाबतची चर्चा होऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व त्यानुषंगाने पुढील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

असा ठराव करण्यात येतो की, म.जी.प्रा. अंतर्गत बळकटीकरण करण्यासंदर्भात झालेला बदल लक्षात घेता प्रस्तावात नमूद केलेल्या विविध कार्यालयांना कार्यालयीन कामकाज जलद गतीने करण्यासाठी एकत्रित आणणे आवश्यक असल्याने व त्यांच्या बैठकीची व्यवस्था पुरेशा जागेअभावी शक्य होत नसल्याने, मंत्रालय परिसरामध्ये अंदाजित ३००० ते ३३०० चौ. फुट जागा भाडे तत्वावर घेण्यास दिलेल्या जाहिरातीस व त्या अनुषंगाने जागा भाडयाने घेण्याच्या पुढील योग्य ती कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.**

वित्त विभाग शासन निर्णय क्र.पीएसयु.१०.१०/सीआर-४/पीएसयु मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक १/७/२०१० च्या तरतुदीच्या अनुषंगाने म.जी.प्रा.ने दिनांक २१/६/२०११ ते २३/११/२०११ पर्यंत केलेल्या गुंतवणूकीस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे , असे मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत करुन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

३०/११

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

ठराव :-

असा ठराव करण्यात येतो की, दि.२१/६/२०११ ते २३/११/२०११ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ : प्राधिकरणाचा लेखापरिक्षणाचे काम भारताचे महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचेकडे सोपविण्याबाबत . कालावधी-दिनांक ०१.४.२०१२ ते ३१.०३.२०१७**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन १/४/२०१२ ते ३१/३/२०१७ या कालावधीतील लेखा परिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांना Comptroller and Auditor General कायदा १९७१ मधील कलम २० (१) नुसार महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्याकडे सोपविण्याचे प्रस्तावित असून त्यास मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्याची कार्यक्रमबाब सादर करण्यात येत असल्याचे मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

याबाबत चर्चा होऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २००९-१० चा वार्षिक प्रशासनिक अहवालास मान्यता प्रदान करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन ०९-१० या वर्षाचा वार्षिक अहवालाबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली त्याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

ठरावः-

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २००९-२०१० या वर्षाचा वार्षिक अहवाल स्वीकृत करण्यात येत असून, तो विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा.सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.९ : म.जी.प्रा.चा सन २००९-१० चा वार्षिक लेखापरिक्षण अहवालास मान्यता प्रदान करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यास मान्यता मिळण्याची सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यात आली. सदर बाबीबाबत सदस्य सचिव यांनी अवगत केले. त्याबाबतचा ठराव खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

ठराव :-

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २००९-१० चे वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवाल महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहाकडे सादर करण्याकरिता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत असून पुढील कार्यवाहीसाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१० म.जी.प्रा.तील सेवा निवृत्ती वेतनधारक आणि कार्यरत कर्मचा-यांचा निवृत्ती वेतन विषयक लाभांचे प्रदान करण्याची कायमस्वरुपी व्यवस्था तयार करण्याबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवा निवृत्ती वेतन धारक व कार्यरत कर्मचा-यांच्या निवृत्ती वेतन विषयक लाभांचे प्रदान करण्याची कायमस्वरुपी व्यवस्था करण्याच्या रुपरेषाबाबत सदस्य सचिव यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन संचालक मंडळासमोर सादर केले यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश केला होता.

प्राधिकरणाच्या अधिकारी /कर्मचा-यांना निवृत्ती वेतन देणे कसे बंधनकारक आहे व शासनाच्या कोणकोणत्या आदेशानुसार प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना निवृत्ती वेतन नियम लागू करण्यात आले आहेत या संबंधीची पार्श्वभूमी विषद केली. गेल्या ५ वर्षामध्ये प्राधिकरणाने पाणी पट्टीपोटी व ई.टी.पी. तसेच इतर शुल्क व पी.एम.सी.मधून प्राधिकरणाला मिळणारे उत्पन्न व विविध शिर्षापोटी उदा.वेतन व भत्ते,निवृत्ती वेतन,प्रशासकीय खर्च, पाणी पुरवठा केंद्राचा देखभाल व दुरुस्तीचा खर्च इत्यादीसाठी झालेल्या खर्चाचा तपशील सविस्तरपणे विषद केला, सध्याच्या उत्पन्नामधून वेतन व भत्ते,निवृत्ती वेतन यावरील खर्च भागविणे कसे अडचणीचे झाले आहे या बद्दल सविस्तर पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन सादरीकरण केले. आतापर्यंत निवृत्तीवेतनासाठी कायमस्वरुपी व्यवस्था यापूर्वी केली नसल्याने हा प्रश्न उपस्थित झाला आहे व दिवसेंदिवस प्राधिकरणाकडील काम कमी होत असून ई.टी.पी.चा दर देखील कमी होत आहे याबाबी विचारात घेता ई.टी.पी.च्या उत्पन्नातून निवृत्तीवेतनाचा खर्च भागविणे अशक्य असल्याने नमुद केले.

निवृत्तीवेतन देण्यासाठी सध्या ई.टी.पी.मधून असलेली तरतूद विचारात घेऊन सन १९७९-८० पासून आतापर्यंता निवृत्तीवेतनापोटी ई.टी.पी. च्या माध्यमातून प्राप्त निधी व त्यापोटी झालेला खर्चाचा तपशील सदस्य सचिवांनी सादर केला . या सादरीकरणाव्दारे सध्याचे निवृत्तीवेतन धारकांनानिवृत्तीवेतन देणे व भविष्यात सेवा निवृत्त होणा-या कर्मचा-यांना निवृत्तीवेतन अदा करणे

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

ई.टी.पी.च्या माध्यमातून कसे शक्य नाही हे स्पष्ट करण्यात आले. म्हणून या निवृत्तीवेतन दायित्वाचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी सर्वसमावेशक व्यवस्थाकरणे गरजेचे असल्याचे सदस्य सचिव यांनी नमुद केले. कायमस्वरुपी पर्यायी व्यवस्था काय असेल याबाबत सदस्य सचिव यांनी पुढीलप्रमाणे विषद केले.

प्राधिकरणाचे बळकटीकरण करण्यासाठी स्वतंत्र कंपन्या करण्याचे प्रस्तावित आहे. निवृत्तीवेतन दायित्वाचा साकल्याने विचार न करता कंपनी स्थापन केल्यास प्राधिकरणाचे स्तरावर औद्योगिक अशांततेला तोंड द्यावे लागेल. ही बाब विचारात घेऊन क्रिसल कंपनीने कंपन्या स्थापना करण्यापूर्वी निवृत्तीवेतनाचे Ring Fencing करण्याची स्पष्ट शिफारस केली आहे. या बाबी विचारात घेता निवृत्तीवेतन दायित्वाचा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यासाठी पर्यायी व्यवस्थेचे रुपरेषा काय असावी याबाबत सदस्य सचिवांनी पुढील प्रमाणे स्पष्टीकरण केले.

१. इरिव्होकेबल ट्रस्ट स्थापन करावा लागेल. या ट्रस्टकडे सध्याच्या निवृत्तीवेतन धारकांचा लाईफ टाईम ॲन्युटी कॉस्ट की जे सध्याच्या दराने अंदाजे रु.७०० कोटी येते ते ट्रस्टकडे जमा करणे. या रु.७०० कोटी पैकी रु. ७२.४९ कोटी प्राधिकरणाच्या निवृत्तीवेतन निधीमध्ये जमा करता येईल व उर्वरित रु. ६२७.५१ कोटी इतकी रक्कम शासनाने एक रकमी उपलब्ध करुन द्यावी

२. अथवा क्रिसल कंपनीने शिफारस केल्याप्रमाणे रु. १४०० कोटी एक रकमी रक्कम शासनाने निवृत्तीवेतनापोटी उपलब्ध करुन द्यावी व ही रक्कम ट्रस्टकडे जमा करावी.

३. अ) यापुढे सेवा निवृत्त होणा-या कर्मचा-यांचे निवृत्तीवेतनाचे दायित्व भागविण्यासाठी कार्यरत कर्मचा-यांचा वेतनाच्या खर्चाच्या १९% इतकी रक्कम निवृत्ती वेतन व रजा वेतन अंशदान म्हणून दरमहा रु. ३.५७ कोटी रक्कम ट्रस्टकडे जमा करावी.

ब) जे अधिकारी/ कर्मचारी स्थानिक संस्थांकडे प्रतिनियुक्तीवर आहेत त्यांच्याबाबत प्राप्त होणारी निवृत्तीवेतन अंशदान व रजा वेतन अंशदानाची रक्कम ट्रस्टकडे जमा करणे व या निधीतून ट्रस्टन विमा कंपनीकडे टप्प्याटप्प्याने लाईफ ॲन्युटी खरेदी करुन निवृत्तीवेतनाचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवावा. या ट्रस्टची रचना अशी असावी याबाबत देखील सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले. सदर सचिव हे या ट्रस्टचे अध्यक्ष राहतील व वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, मुख्य प्रशासकीय अधिकारी, कायदा व कामगार अधिकारी व जेष्ठ मुख्य अभियंता हे या ट्रस्टचे सदस्य राहतील.

आयकराच्या सवलती मिळण्यासाठी सदर ट्रस्टची नोंदणी आयकर खात्याकडेकरण्यात येईल. यावर प्रधान सचिव यांनी अशी सूचना केली की, लाईफ ॲन्युटी खरेदी करतांना खाजगी

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

विमा कंपनीकडून करता ती सरकारी कंपनीकडून खरेदी केल्यास निवृत्तीवेनाला संरक्षण राहिल. मा. उपाध्यक्ष यांनी असे नमूद केले की, हा प्रस्ताव अत्यंत चांगला असून प्राधिकरणाच्या कर्मचा-यांचा निवृत्तीवेतनाचा प्रश्न कायमस्वरुपी सुटू शकेल. म्हणून सदस्य सचिव यांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनमध्ये जे मुद्दे मांडले आहेत ते मुद्दे मंत्रिमंडळासमोर ठेवावेत अशीही सूचना मा. उपाध्यक्ष यांनी केली.

ठराव :-

१) असा ठराव करण्यात येतो की, निवृत्ती वेतन योजनेचे व्यवस्थापन करण्यासाठी Irrevocable Trust स्थापन करण्यात यावा.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सध्याचे निवृत्तीवेतन धारकांची लाईफ ॲन्युटी खरेदी करण्यासांठी शासनाकडे एक रकमी रु. ६२७.५१ कोटीचे अर्थसहाय्याची मागणी करण्यात यावी.

३) शासनास एक रकमी रु. ६२७.५१ कोटी देणे शक्य नसल्यास दरवर्षी शासनाने रु. १०० कोटी ,आतापर्यंत निवृत्त झालेल्या कर्मचा-यांची पूर्ण Life Time Annuity खरेदी पूर्ण होईपर्यंत उपलब्ध करुन द्यावी.

४) यापुढे निवृत्त होणा-या कर्मचा-यांची निवृत्ती वेतनाच्या उपाययोजनांसाठी, निवृत्तीवेतन व रजा वेतन अंशदानाच्या दराप्रमाणे दरमहा जमा होणारी रक्कम व प्रतिनियुक्तीवरील कर्मचा-यांची प्राधिकरणाकडे जमा होणारी रक्कम निवृत्ती वेतन व रजा वेतन अंशदानाच्या रकमेचा तसेच उपरोक्त (२) व (३) प्रमाणे शासनाकडून प्राप्त होणा-या रकमेचा स्वतंत्र (Irrevocable Trust) विश्वस्त निधी निर्माण करावा व या निधीकडे जमा करावा व त्यातून दरमहा निवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या निवृत्तीवेतनासाठी Life Time Annuity खरेदी करण्यात यावी. या विश्वस्त निधीची आयकर आयुक्तांकडे नोंदणी करावी. या निधीवर विश्वस्त म्हणून सदस्य सचिव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, कायदा व कामगार अधिकारी व जेष्ठतम मुख्य अभियंता हे असावेत.

उपरोक्त ठरावाची अंमलबजावणी व निवृत्ती वेतन योजना कार्यान्वित करण्यासाठी सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.११ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या नवी मुंबई येथील सदनिका (अधिकारी / कर्मचा-यांचे निवासस्थान )लिलावाव्दारे विकण्याबाबत.**

मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळा असे अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची नवी मुंबई परिसरात एकंदर १३५ निवासस्थाने आहेत. ती १८०, २५०,३५० इत्यादी चौरस फुट क्षेत्रफळाची आहेत. सदर निवासस्थाने ३० वर्षापूर्वीची जूनी असून

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

३०/११

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

त्यामध्ये कोणीही राहत नसल्याने ती मोडकळीस आलेली आहेत. उक्त निवासस्थानापैकी ६६ निवासस्थानात म.जी.प्रा. चे कर्मचारी रहात असून उर्वरित ६९ निवासस्थाने रिक्त आहेत . सदर निवासस्थाने बाजार भाव /बोलीच्या किमतीनुसार विहित पध्दतीचा म्हणजेच लिलावाव्दारे विकण्याचे प्रस्तावित आहे. यावर मा. मंत्री, पा.पु. व स्व.तथा म.जी.प्रा. चे अध्यक्ष, यांनी असे सूचित केले की, म.जी.प्रा.चे कर्मचारी निवासस्थानात राहत आहेत त्यांनाच सदर निवासस्थाने विकण्यास काय हरकत आहे.

याबाबत मा. सदस्य सचिव, यांनी असे सूचीत केले की,सदर निवासस्थानास मी भेट दिली असून म.जी.प्रा.च्या वरिल निवासस्थानात राहात असलेल्या कर्मचा-यांनी माझ्याकडे निवेदन देऊन सदर निवासस्थाने कर्मचा-यांना विकण्याबाबत विनंती केली आहे.

एकूण १३५ सदनिकांपैकी ४० सदनिका एकाच इमारतीत आहेत,तर ९५ सदनिका विखुरलेल्या आहेत. १३५ पैकी ६६ सदनिकांचे वाटप करण्यांत आले आहेत. त्यांत कर्मचारी राहतात. उर्वरित ६९ रिकाम्या सदनिका आहेत. त्यापैकी १२ सदनिका एकाच इमारतीत आहेत. यास्तव प्रस्तावित करण्यांत येते की, एकूण ६९ सदनिका बाजारभावाप्रमाणे स्पर्धात्मक बोली मागवून सर्वात जास्त बोली देणा-यास विकणे. तथापि, सदरच्या निवासस्थानांची विक्री करण्यापूर्वी प्राप्त झालेल्या जास्तीत जास्त किंमतीइतका देकार प्राधिकरणाच्या इच्छुक अधिकारी / कर्मचा-यांनी दिला तर त्यांना Right of first refusal तत्वावर विकण्याचे प्रस्तावित आहे. असा देकार कर्मचारी /अधिकारी यांनी दिला नाही, तर जास्तीत जास्त किंमतीचा देकार देणा-यास सदनिका विकण्यात येईल. याबाबत खालील प्रमाणे ठराव करण्यात येत आहे.

## ठराव :-

वरील परिस्थितीचा विचार करता, नवी मुंबई परिसरातील ( बेलापूर सी.बी.डी. वाशी व नेरुळ ) येथील प्राधिकरणाच्या मालकीच्या विखुरलेल्या रिक्त निवासस्थानाकरिता प्राधिकरणास सद्यस्थितीत दरवर्षी मालमत्ता कर इत्यादीसाठी होणारा नाहक खर्च टाळणेकरिता तसेच प्राधिकरणावर येणारा आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने , सदरची विखुरलेली एकूण ६९ अथवा नेमकी रिक्त असतील तितकी निवासस्थाने शासनाच्या प्रचलित नियमानुसार अथवा बाजारभावाप्रमाणे जशी आहेत तशी या अटीवर विक्री करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तथापि, असे करीत असतांना निवासस्थानांची विक्री करण्यापूर्वी स्पर्धात्मक बोली मागवतांना प्राप्त झालेल्या जास्तीत जास्त बोलीनुसार अथवा जाहिररित्या मागविलेल्या निविदेनुसार प्राप्त झालेल्या जास्तीत जास्त दरानुसार विक्री करावी. तथापि, सदर सदनिकांची विक्री करण्यापूर्वी प्राप्त झालेल्या जास्तीत

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, प्रा.पु.व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

जास्त बोलीनुसार सध्या रहात असलेल्या कर्मचा-यांनी / अधिका-यांनी अथवा जेथे कर्मचारी राहात नाहीत तेथे स्थाई महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचारी यांनी /अधिका-यांनी वरिल रक्कमेस निवासस्थाने विकत घेण्यास संमती दर्शविल्यास त्यांना प्रथम प्राथम्याने Right of First refusal या तत्वानुसार देण्यात येतील.

तथापी ज्या कर्मचा-यांकडे मुंबई,नवी मुंबई ,ठाणे व पनवेल / खारघर येथे ज्या कर्मचा-यांच्या पती / पत्नीच्या नांवे मालकीची घरे आहेत त्यांना या योजनेसाठी पात्र समजण्यात येऊ नये. मा. सदस्य सचिव यांना पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १२ : म.जी.प्रा. व संलग्न कार्यालयाचे Video Conferncing करण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिवांनी संचालक मंडळास असे सूचीत केले की,मा.मंत्री,पा.पु. व स्व.तथा म.जी.प्रा.चे अध्यक्ष,उपाध्यक्ष तसेच प्रधान सचिव,पा.पु.व स्व.व इतर मुख्य अभियंता यांना Video Conferncing व्दारे संपर्क साधून माहिती करुन घेणे व वरिष्ठांना माहितीचे देवाण घेवाण करणे यासाठी प्रथमत: मा.मंत्री,पा.पु. व स्व, मा. राज्यमंत्री,पा.पु.व स्व. मा.सदस्य सचिव,एक्सप्रेस टॉवर्स,मुंबई येथील कार्यालयात वरिल सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**ठराव :-**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या क्षेत्रिय तसेच इतर संलग्न कार्यालयांशी थेट संपर्क साधून नियंत्रण ठेवण्यासाठी मा.मंत्री, पा.पु.व स्व,मा.राज्यमंत्री,पा.पु.व स्व. तसेच सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना Video Conferncing सुविधा उपलब्ध करुन घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तथापि हे काम माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचा (DIT) सल्ला घेऊन करावे व फेज मध्ये करावे .पहिल्या फेज मध्ये मंत्रालय,ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे विभागीय कार्यालये घ्यावीत यासाठी योग्य ती पुढील कार्यवाही करण्यासाठी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १३ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी नियमानुसार मजीप्राच्या महत्वाच्या जागा BOT तत्वावर विकसीत करणे.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिवांनी संचालक मंडळास असे सूचीत केले की, म.जी.प्रा.च्या १२१ व्या बैठकीमध्ये वरिल बाब चर्चेसाठी मांडण्यात आली होती. तथापि काही त्रुटी

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

30/11

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

असल्याने त्याबाबत ऊहापोह करुन सदर कार्यक्रम बाब पुन्हा सादर करण्याचे निर्देश प्राप्त होते त्या अनुषंगाने पुनश्च कार्यक्रम बाब सादर करण्यात येत आहे. यावर मा. मंत्री,पा.पु. व स्व.तथा अध्यक्ष, यांनी असे निर्देश दिले की, फक्त अंधेरी मुंबई येथील जागेचाच BOT तत्वावर विचार न करता पनवेल,बदलापूर व इतर प्रत्येक प्रादेशिक स्तरावरील म.जी.प्रा.च्या मालकीच्या एका जागेचा BOT तत्वावर विचार करावा असे सूचीत केले याबाबत मा.सदस्य सचिव यांनी सूचीत केले की, प्रथम अंधेरी, मुंबई येथील जागेबाबत विचार करावा व पुढील बैठकीवेळी इतर जागेचाही विचार करता येईल असे प्रस्तावित केले.

**ठराव:-**

अंधेरी येथील न.भू.क्र.२२७ अ या १८०० चौ.मी.क्षेत्रफळाच्या म.जी.प्रा.च्या मालकीच्या भूखंडाराचा "बांधा ,वापरा व हस्तांतरीत करा " या तत्वावर विकास करण्यासाठी म.जी.प्रा.स मिळणा-या जागेचे सुयोग्य नियोजन करुन विकास कामे प्रस्तावित करण्यासाठी शासनाचे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ यांचे सल्ल्याने याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास तसेच यापुढील अशा BOT तत्वावरील विकासाच्या प्रक्रियेस चालना देण्यासाठी प्रत्येक महसूल विभागात एक प्रकल्प तात्काळ हाती घेण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. १४ : अकोले व ३२ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची निविदा पाईप पुरवठयासह निविदा काढण्याबाबत.**

विषयांकित योजनेच्या निविदा पाईप पुरवठयासह काढण्याची मागणी मा. आमदार श्री. मधुकरराव पिचड यांनी मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांच्या केली आहे. तथापि, असाच प्रस्ताव गोंदिया पाणी पुरवठा योजनेसाठी प्राप्त झाला असता ते दिनांक २९/३/२०११ च्या १२० व्या बैठकीत अमान्य करण्यात आला असल्याचे मा. सदस्य सचिव यांनी स्पष्ट करुन योग्य तो निर्णय घेण्यासाठी कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे संचालक मंडळास अवगत केले.

सदर बाबत सखोल चर्चा करण्यात आली. यामध्ये पाईप्ससह व पाईप विना निविदा काढण्यात होणारे फायदे व तोटे याबाबत चर्चा झाली. याबाबत सर्वकंष आढावा घेऊन धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याचे संचालक मंडळाचे मत झाले.

तथापि, एक विशेष बाब म्हणून अकोले व ३२ गांवे पाणी पुरवठा योजनांची निविदा पाईप पुरवठयासह करण्यास मान्यता द्यावी असे मा.मंत्री, पा.पु. व स्व.यांनी नमूद केले. त्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने सखोल अभ्यास करुन तसे कार्यक्रम बाब सादर स्वतंत्रपणे करण्याचे निर्देश देण्यात आले व या अनुषंगाने वरिल कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

आयत्या वेळीच्या चर्चा

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सिडको भवन नवी मुंबई येथे दक्षिण बाजूकडील चार मजले महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची आहेत. सध्या पहिला व चौथ्या मजल्यावरील जागा ही अनुक्रमे पाणी पुरवठा व स्वच्छता अंतर्गत जलस्वराज्य हे कार्यालय कार्यरत आहे तसेच चौथ्या मजल्यावर न्यायालय व लेखा व गोषागारे या विभागाचे अभिलेखे ठेवण्यात आले आहे म.जी.प्रा.चे पुनर्रचना करण्यात आले आहे सध्या दुस-या व चौथ्या मजल्यावर जे कक्ष आहेत त्यांच्या बसण्याच्या व्यवस्थेत बदल करुन दुसरा व तिसरा मजल्याचे (Renovation) करावयाचे आहे असे मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. यास संचालक मंडळाने तत्वत: मान्यता देऊन पुढील कार्यवाही करण्यास मा. सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यात आले.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने, उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

मा.अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु.व स्व.

३०/११

सदस्य सचिव
म.जी.प्रा.